दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
● गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजचा व्हॉलिबॉल स्पर्धेतील विजेता संघ.

# झोनल पुरुष व्हॉलिबॉल स्पर्धेत विवेकानंद कॉलेज तृतीय

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ झोनल पुरुष व्हॉलिबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय संघ तृतीय ठरला. महाविद्यालयाच्या संघाची कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी येथे होणाऱ्या इंटरझोनल व्हॉलिबॉलसाठी निवड झाली. खेळाडूंचे यशस्वी अभिनंदन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'विवेकानंद'मध्ये कायदेविषयक कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत कायदेशीर बाबींचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर सचिव डी. ए. डोईफोडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी पोस्को व मुलींच्या लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डी. आर. पाटील यांनी केले. आभार प्रा. एम. आर. नवले यांनी मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. यावेळी प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा एल. एस. नाकाडी, प्रा. पी. एन. कांबळे, प्रा. एच. जी. पाटील होते.

पुण्य नगरी
गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजचा इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेत विजय

## शिवाजी विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत १२० खेळाडूंचा सहभाग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या इंटरझोनल टेबल टेनिस मुले व मुलींच्या स्पर्धांचे आयोजन विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये करण्यात आले होते. या स्पर्धेत सातारा, सांगली, कोल्हापूर या तिन्ही विभागांतील एकूण ६० मुले व ६० मुली असे एकूण १२० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धा साखळी फेरीतून बाद पद्धतीने खेळवण्यात आल्या. अंतिम सामना विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर विरुद्ध के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर यांच्यामध्ये झाला. यामध्ये विवेकानंद कॉलेजने ५-३ ने के.आयटी. कॉलेजवर विजय मिळवून विजेतेपद पटकाविले.




या स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस समारंभ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते पार पडला. या स्पर्धेमधून गुजरात येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा मुला-मुलींच्या टेबल टेनिस संघाची निवड करण्यात आली. याप्रसंगी निवड समितीचे अध्यक्ष डॉ. दीपक डांगे-पाटील, प्रा. किरण पाटील, प्रा. योगिता परमाणे, स्पर्धा निरीक्षक रुद्रेश मल्लाप्पा हे उपस्थित होते.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पुण्य नगरी | गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५



# विवेकानंद कॉलेजचा व्हॉलीबॉल संघ तृतीय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर झोनल पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या संघाची कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी येथे होणाऱ्या इंटरझोनल व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे आणि सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि सुरेश चरापले यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. महाविद्यालयात या यशाबद्दल खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले असून, इंटरझोनल स्पर्धेतही त्यांनी आणखी चांगली कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.